महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ मधील कलम ३०८ बाबत स्पष्टीकरणात्मक सूचना.

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
शासन परिपत्रक क्र.एमसीओ-२०१९/प्र.क्र.१३१/नवि-१४,
मंत्रालय, मुख्य इमारत (४ था मजला),
हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड,
मुंबई ४०० ०३२.
दिनांक १२ जुलै, २०१९

संदर्भ: - महाराष्ट्र अधिनियम क्र.२१/२०१८, दि.३१.०३.२०१८.

शासन परिपत्रक: -

महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायत व औद्योगिक नगरी अधिनियम ,१९६५ मधील कलम ३०८ मध्ये नगरपरिषदा व नगरपंचायतीच्या बेकायदेशीर, व्यापक जनहित तसेच, आर्थिक हिताविरोधी ठराव निलंबित करणे अथवा रद्द करण्याबाबतच्या तरतूदी विहीत आहेत.

२. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियमातील कलम ३०८(१) च्या तरतुदीत दि.३१.०३.२०१८ च्या अधिनियम क्रमांक २५ अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. सदर सुधारणेनुसार नगरपरिषदा व नगरपंचायतीचे बेकायदेशीर ठराव निलंबित करणे अथवा रद्द करणे यासाठी सदर बाब आवश्यक कार्यवाहीस्तव जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी संबंधित मुख्याधिकाऱ्यांवर सुनिश्चित करण्यात आली आहे.

३. सन २०१८ मध्ये अधिनियमात सदर सुधारणा करण्यापूर्वी नगरपरिषदांचे ठराव नगरपरिषदेच्या आर्थिक हिताच्या विरोधी अथवा व्यापक लोकहीतास बाधा आणणारे अथवा शासनाच्या ध्येय धोरणाशी विसंगत असल्याची बाब लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक अथवा नागरी संस्थांकडून जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणुण दिल्यास जिल्हाधिकारी असे ठराव स्थगित अथवा रद्द करण्याची कार्यवाही करत.

४. तथापि, अधिनियमातील सदर सुधारणेमुळे नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे नियमोचीत नसलेले ठराव निलंबित अथवा रद्द करण्याबाबत, सर्वसामान्य नागरिक अथवा लोकप्रतिनिधी जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणू शकतील किंवा कसे याबाबत संभ्रम निर्माण झाल्याची बाब शासनास निदर्शित झाली आहे. सदर बाब विचारात घेऊन, त्यानुषंगाने कलम ३०८ नुसार आवश्यक कार्यवाही होण्याच्या दृष्टीने, शासन खालीलप्रमाणे स्पष्टीकरणात्मक सूचना देत आहे: -

(अ) अधिनियमातील सुधारणेनुसार नगरपरिषदा/ नगरपंचायतींचे कामकाज नियमानुसार होण्याच्या दृष्टीने, बेकायदेशीर ठराव निलंबित करणे अथवा रद्द करणे यासाठी सदर बाब आवश्यक कार्यवाहीस्तव जिल्हाधिकारी यांच्या निदर्शनास आणण्याची जबाबदारी मुलत: संबंधित मुख्याधिकाऱ्यांची आहे.

(ब) तथापि, अधिनियमातील सुधारणेचा मुळ हेतू नगरपरिषदा/ नगरपंचायतींच्या कामात लोकाभिमुखता, पारदर्शकता व गतिमानता आणणे हा आहे. त्यामुळे, नगरपरिषदा/ नगरपंचायतींनी बेकायदेशीर, शासन निदेश व व्यापक जनहित विरोधी ठराव केल्यास, सदर बाब लोकप्रतिनिधी, सर्वसामान्य नागरिक अथवा नागरी संस्थांना जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणता येईल.

(क) कोणत्याही व्यक्तीने अशी बाब संबंधित जिल्हाधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणल्यास जिल्हाधिकाऱ्यांनी या बाबत नियमोचीत कार्यवाहीसाठी अशा निवेदनांची दखल घेणे आवश्यक आहे.

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संकेताक २०१९०७१२१५००४१८३२५ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sanjay S Gokhale

Digitally signed by Sanjay S Gokhale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Urban Development, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ab8a7eeedad158d24cf530f0d6b662808245be49a8459ed4c63961ebdc3cb961, cn=Sanjay S Gokhale
Date: 2019.07.12 15:06:56 +05'30'

(सं.श.गोखले)

शासनाचे सह सचिव

प्रत: -

१. मा.मुख्यमंत्री महोदयांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. प्रधान सचिव (नवि-२), नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
४. आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय, मंत्रालय, मुंबई.
५. विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
६. जिल्हाधिकारी (सर्व)
७. सर्व सह / उप सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
८. सर्व मुख्याधिकारी नगरपरिषदा/ नगरपंचायती.
९. निवडनस्ती (नवि-१४)